**CNR No. MHWR12-002843-2020.**

वि.दि.दा. क्र. २०/२०२०
जैन लॉरी ऑरेंजर्स -वि- भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ मर्यादीत

**नि.क्र. २६ वर आदेश**
**(दिनांक १८/०२/२०२२)**

प्रतिवादी क्र १ ने सदर अर्ज हा दिनांक ०१/०१/२०२१ रोजी त्यांच्या विरुध्द झालेला बिनालेखी जबाबाचा आदेश रद्द करुन लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी करिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जाचे व त्यावर आलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले.

३. प्रतिवादीचे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ चे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे व तिथे कोरोणा संसर्ग जास्त असल्याकारणाने ते आपल्या वकीलांना लेखी बयाण दाखल करण्याकरीता माहीती देवू शकले नाही त्यामूळे ते त्यांचा लेखी जबाब दाखल करु शकले नाही. त्यामूळे त्यांच्याविरुध्द दिनांक ०१.१०.२०२१ ला त्यांच्याविरुध्द विना लेखी जबाबाचा आदेश झाला आहे. प्रतिवादीचा लेखी जबाबत तयार आहे व त्यांना सदर दाव्यामध्ये भाग घेवून दावा चालवायचा आहे. करीत दिनांक ०१.१०.२०२१ चा आदेश रद्द करुन त्यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. वादीने सदर अर्जावर आक्षेप घेतला आहे. वादीचे म्हणने आहे की, वादीने उशिरा लेखी जबाब दाखल करण्याचे कोणतेही सबळ कारण दिले नाही. जर प्रतिवादीला लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी दिल्यास त्यांच्यावर जास्तीत जास्त खर्च बसविण्यात यावा.

५. प्रतिवादी क्र. १ ला लेखी जबाब दाखल करण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट दाव्याचा निकाल हा गुणवत्तेवर लागेल. करिता प्रतिवादीला लेखी बयाण दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचीत होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ने वादीला खर्च म्हणून रुपये ३००/- द्यावे.

RAJSHRI MANOHAR GANVIR
Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2022.02.18 17:19:03 +0530

दिनांक १८/०२/२०२२.

(राजश्री एम. गणवीर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, हिंगणघाट

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word to word as per original order.

(R. M.Kannake)
Stenographer Grade III